# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिरात

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या** (1) **के.बी. भाभा रुग्णालय**, **वांद्रे (पश्चिम)**, (2) **व्ही.एन. देसाई रुग्णालय**, **सांताक्रुझ**, (3) **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय**, **कांदिवली (पश्चिम)**, (4) **के.बी. भाभा रुग्णालय**, **कुर्ला (पश्चिम)**, (5) **शताब्दी रुग्णालय**, **गोवंडी**, (6) **राजावाडी रुग्णालय**, **घाटकोपर या उपनगरीय रुग्णालयांमध्ये डिप्लोमॅट ऑफ नॅशनल बोर्ड प्रोग्राम (डी.एन.बी.)** करिता **जाहिरातीद्वारे कंत्राटी** तत्वावर खाली नमूद केलेल्या रिकत पदांवर **नियुक्ती करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| अ.क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या (अंदाजे) | दरमहा निश्चित वेतन |
|---|---|---|---|
| 1 | कनिष्ठ ग्रंथपाल | 01 | रुपये 25,000/- |
| 2 | कनिष्ठ आहारतज्ञ | 04 | रुपये 25,000/- |
| 3 | ऑप्टोमेट्रीस्ट | 03 | रुपये 25,000/- |
| 4 | ऑडिओलॉजिस्ट | 04 | रुपये 25,000/- |
| 5 | एक्झीक्युटिव्ह असिस्टंट | 03 | रुपये 15,000/- |
| | | एकूण - 15 | |

इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील आपले उमेदवारी अर्ज कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, दिनांक 16.09.2021 ते दिनांक 24.09.2021 या कालावधीत सकाळी 11.00 ते सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयाच्या आवक-जावक विभागात (महाविद्यालय इमारत, तळ मजला) प्रत्यक्ष सादर करावेत. नमूद केलेल्या कालावधीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा, अपूर्ण भरलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**शैक्षणिक अर्हताः**

(1) कनिष्ठ ग्रंथपाल - उमेदवार मुंबई विद्यापीठ वा तत्सम मान्यताप्राप्त विद्यापीठातील लायब्ररी सायन्समधील पदवी किंवा पदविकाधारक असणे आवश्यक आहे. उमेदवारास पूर्वीचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

(2) कनिष्ठ आहारतज्ञ - उमेदवार मान्यताप्राप्त संस्थेतील वैधानिक विद्यापीठाच्या होम सायन्समधील पदवीधारक असावा किंवा डायटिक्स, न्युट्रीशन मधील पदव्युत्तर पदविकाधारक असावा. उमेदवारास मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

(3) ऑप्टोमेट्रीस्ट - उमेदवार हा शालांत (एस.एस.सी.) परीक्षेसह ऑप्टोमेट्रीमधील 3 वर्षांचा पदविकाधारक असावा किंवा उच्च माध्यमिक शालांत (एच.एस.सी.) परीक्षेसह बी.एस्सी. ऑप्टोमेट्रीमधील पदवीधारक असावा. पदवीधारक उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

(4) ऑडिओलॉजिस्ट - उमेदवार भारत, इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रलिया किंवा कॅनडा येथील मान्यताप्राप्त संस्थेतील ऑडिओलॉजी आणि स्पीच थेरपीमधील पदवी किंवा पदविकाधारक असावा. पदवीधारक उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. उमेदवारास मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

(5) एक्झीक्युटिव्ह असिस्टंट - उमेदवार हा कला, वाणिज्य किंवा विज्ञान यापैकी कोणत्याही शाखेतील पदवीधारक असावा आणि उमेदवार महाराष्ट्र शासनाची इंग्रजी व मराठी टंकलेखनाची परीक्षा तसेच एम.एस.- सीआयटी परीक्षा उत्तीर्ण असावा.

**सर्वसाधारण अटी व शर्ती :**

1) सदर नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी तत्वावर असेल.
2) नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांची सेवा आवश्यकता नसेल त्यावेळी कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.
3) अगोदरच महानगरपालिकेच्या सेवेमध्ये असलेल्या कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या खाते प्रमुखामार्फत `ना हरकत प्रमाणपत्र` सादर करावे.
4) अपूर्ण असलेले अर्ज आणि विहित प्रपत्रामध्ये नसलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
5) अर्जावर स्वतःचे अद्ययावत पासपोर्ट आकाराचे छायाचित्र स्वतःच्या स्वाक्षरीसह चिटकविण्यात यावे.
6) उमेदवाराने अर्हतेबाबत नोंद घ्यावी. उमेदवार अर्हता व शर्ती पूर्ण करत नसल्यास व नियुक्त केले गेल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची सेवा त्वरित खंडित करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
7) स्वतःचा पोष्टाचा पत्ता पीनकोड क्रमांकासहित पूर्ण असावा आणि मोबाईल नंबर, ई-मेल आयडीसह पूर्ण नमूद करण्यात यावा.
8) उमेदवारास मराठी लिहिता, वाचता व बोलता आले पाहिजे.
9) खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय 18 वर्षे ते 38 वर्षे तसेच मागासवर्गीय उमेदवाराचे वय 18 वर्षे ते 43 वर्षे या दरम्यान असावे.
10) उमेदवाराने शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक दाखले, माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षाच्या गुण पत्रिका अर्जासोबत जोडाव्यात.
11) विवाहित महिलांनी त्यांचा विवाहाचा दाखला, गॅझेटची प्रत, नांव बदलल्याचा दाखला इ. अर्जासोबत जोडावे. उमेदवारांनी एक पेक्षा जास्त प्रयत्नात परिक्षा

उत्तीर्ण केलेल्या असल्यास त्याप्रमाणे प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती जोडाव्यात.

12) निवड झालेल्या उमेदवाराची मुंबई महानगरपालिकेच्या कोणत्याही उपनगरीय रुग्णालयामध्ये जेथे पद रिक्त असेल तेथे नियुक्त करण्यात येईल.

13) उमेदवाराने खोटी प्रमाणपत्रे सादर केल्यास किंवा अपूर्ण अर्ज सादर केल्यास, विहित पात्रता धारण करीत नसल्यास त्यांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

14) निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीनंतर प्रत्येक तीन महिन्यांनंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देण्यात येईल.

15) उमेदवाराला मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

16) उमेदवारांना विनंती आहे की, मुलाखतीस येतांना त्यांनी अर्जासोबत सादर केलेल्या शैक्षणिक अर्हता व अन्य प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींची सर्व मूळ प्रमाणपत्रे पडताळणीसाठी सोबत घेऊन यावीत.

17) उमेदवारांच्या मुलाखती दिनांक 28.09.2021 रोजी सकाळी 10.00 वाजता, कॅम्युनिटी मेडिसीन हॉल, पहिला मजला, लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय इमारत, शीव, मुंबई-400022 येथे घेण्यात येतील.

18) उमेदवारांची कार्यालयीन कामकाजाची वेळ सोमवार ते शनिवार कार्यालयीन सोईनुसार सकाळी 9.00 ते सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत राहील. आवश्यकता भासली तर सक्षम प्राधिकारी कार्यालयीन वेळेत बदल करु शकतील.

19) अर्जाचा नमुना आणि वैयक्तिक माहितीपत्रक नमुना लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, कॉलेज बिल्डिंग, तळ मजला, रोख विभाग, खोली क्र. 15 येथे दिनांक 16.09.2021 पासून दिनांक 24.09.2021 पर्यंत सोमवार ते शुक्रवार, सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 या वेळेत रुपये 100/- अधिक जीएसटी रु. 5/- असे एकूण रुपये 105/- या किंमतीस उपलब्ध राहिल.

Sd/-
डॉ. प्रदीप जाधव,
प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व
खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा)

Sd/-
डॉ. मोहन जोशी
अधिष्ठाता, लो.टि.म.स.रुग्णालय

**टिपः उमेदवाराने अर्ज विकत घेतल्याच्या मूळ पावतीची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे. त्याशिवाय अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.**

चं.खें./140921